# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १३३** **दिनांक- २१/०५/२०२१**

**नवघर पोलीसांनी लावला मोटार सायकलचा अपहार करणाऱ्या आरोपीचा शोध.गुन्हे तपासात मोटार सायकल हस्तगत करून आरोपीस केले जेरबंद**

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३७८/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ४०६ प्रमाणे दि. १९.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री. जितेन जयंतीलाल सोलंकी, यांनी त्यांचे मालकीची बजाज कंपनीची ॲवेंजर मोटार सायकल विक्रीसाठी ओ.एल.एक्स. या वेबसाईटवर जाहिरात प्रसारीत केली होती. फिर्यादी यांची मोटार सायकल हर्दिक शहा नावाचे इसमाने विकत घेण्याची तयार दर्शवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांची मोटार सायकल चालवुन पाहतो असे सांगुन घेवुन फिर्यादी यांना परत न करता तिचा अपहार केलेला होता.

सदर गुन्हा हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास व बातमीदारामार्फत गुन्हा करणा-या आरोपीस अटक करुन फिर्यादी यांची अपहार केलेली मोटार सायकल क्र. एमएच-४७-एफ-२६४१ हस्तगत केलेली आहे.

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे सपोनि/भास्कर पुल्ली, सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केला आहे.

-------------ooooo-------------

Scanned with CamScanner